**नियमित दिवाणी दावा क्र. १५/२०१८**
**निशाणी ३७ लगत**

**वादी तर्फे साक्षीदार क्र.१ स्वतः वादी रामचंद्र भागा बोडेकर यांचा उलटतपास शपथेवर, प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे विधीज्ञ श्री. एस. एच. पेडणेकर यांचेकडून–**

१२. मी जमीनीत आठ आणे हिस्सा मिळण्यासाठी दावा केला आहे. दावा मिळकतीचे एकूण क्षेत्र ०४ एकर १० गुंठे इतके आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीत भात लागवड होते. मला सातबारा उतारा, फेरफार, ८–अ चा उतारा हे दस्त समजतात. मी दावा मिळकतीचे सातबारा उतारा, फेरफार, ८–अ चा उतारा असे सर्व दस्त पाहिले आहेत.

१३. दावा मिळकत माझे आजोबा धाकला बोडेकर यांचेकडे कशी आली, हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत सर्व्हे नं. ३२ हिस्सा नं. ३–अ ही लखू धाकला बोडेकर याने स्वतः २२/०६/१९५५ रोजी खरेदी घेतली होती. दिनांक २२/०६/१९५५ रोजी लखू धाकला बोडेकर याने दावा मिळकत संपादित केल्यावरुन फेरफार क्रमांक १०३ झाला, या तुमचे सुचनेबाबत माझे सांगणे की, त्यावेळी आमचे कुटुंब एकत्र होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावरुन फेरफार क्र. १०३ मंजुर झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी फेरफार क्र. १०३ बाबत काहीही कारवाई केलेली नाही.

१४. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे नं. ३२ हिस्सा नं. २ ही जमीन माझे वडील भागा यांनी दिनांक २१/०६/१९५५ रोजी संपादीत केली. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबत फेरफार क्र. ९४ मंजुर झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, भागा व लखा यांचे १९५५ सालापासून स्वतंत्र व्यवहार होते, असे या स्वतंत्र संपादनांवरुन दिसते, साक्षीदार सांगतो की, कुटुंब एकत्रच होते.

१५. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांचे नावे घेतलेली सर्व्हे क्र. ३२ हिस्सा क्र. २ व दावा मिळकत सर्व्हे क्र. ३२ हिस्सा क्र. ३–अ या मिळकतींशी माझे आजोबा धाकला बोडेकर यांचा काही संबंध नाही. या दोन्ही मिळकती धाकला बोडेकर यांसी संबंधित होत्या, असे दाखविणारा काही कागद मी या प्रकरणी दाखल केला आहे किंवा कसे हे मला आता आठवत नाही.

**प्रश्न** – १९५५ सालापासून दावा मिळकतीला लखू धाकला बोडेकर यांचे व त्यांचे पश्चात बाबू बोडेकर यांचे नाव होते, हे खरे का ?

**उत्तर** – साक्षीदाराने नमूद केले की, त्याला अस्वस्थ वाटत आहे, तो उत्तर देऊ शकत नाही.

**(आता, सायंकाळचे ०५.३० वाजलेले आहेत. प्रकरण तहकूब करण्यास हरकत नाही असे दोन्ही विधीज्ञांनी नमूद केले. सबब, पुढील उलटतपास दिनांक २१/०४/२०२३ पर्यंत तहकूब.)**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

BALIRAM DATTATRAYA TARE
Digitally signed by BALIRAM DATTATRAYA TARE
Date: 2023.03.29 17:47:08 +0530

(ब. द. तारे)

दि.२९/०३/२०२३ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, देवरुख

**CERTIFICATE**

Evidence in RCS no. 15-2018

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. S. Thaware (Jr. Clerk) |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 29/03/2023 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 29/03/2023 |
| Evidence uploaded on | : | 29/03/2023 |